IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Impact Factor: 7.301

Volume 3, Issue 3, January 2023

# ब्रिटिश कालखंडातील रायगड जिल्ह्यातील शिक्षण विकास

**प्रा. डॉ. प्रभाकर गणपत गावंड**

सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर, रायगड

pggawand@gmail.com

**गोषवारा**

भारतात ब्रिटिशांचे आगमन होईपर्यंत भारतीय शिक्षणाचे स्वरुप हे प्रामुख्याने पारंपारिक व धार्मिक स्वरुपाचे होते. भारतातील बहुसंख्य हिंदू धर्मीयांचे शिक्षण हे पारंपारिक पाठशाळांमधून होत असे तर मुस्लिम धर्मीयांसाठी मदरशांमधून शिक्षण दिले जाई. हिंदू धर्मात ब्राम्हणांची शिक्षणावर मक्तेदारी होती. प्रामुख्याने संस्कृत भाषेमधून शिक्षण दिले जाई. मुस्लिम मदरशांतील शिक्षण हे अरबी भाषेत दिले जाई. संस्कृत आणि अरबी या भाषा सामान्य लोकांमध्ये बोलल्या जात नव्हत्या. या काळातील शिक्षण हे पारंपारिक पध्दतीचे होते. ब्रिटिश भारतात आल्यानंतर भारतीय षिक्षण पध्दतीचे वास्तव त्यांच्या लक्षात आले. विल्यम कॅरी या खिश्चन मिषनऱ्याने बंगाल व मद्रास प्रांतात प्रथम इंग्रजी शाळा स्थापन केली.' आणि खऱ्या अर्थाने इंग्रजी शिक्षणाचा पाया भारतात घातला गेला.

ब्रिटिश सत्ता भारतात स्थिरावल्यानंतर त्यांनी भारतात अनेक प्रकारच्या सुधारणा घडवून आणण्यास प्रारंभ केला. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार हा त्यांचाच एक भाग होता. मुळात ब्रिटिशांनी भारतात शिक्षणाचा सुरू केलेला प्रसार हा भारतीय लोकांना सज्ञान करणे, शहाणे करणे, त्यांच्यातील मागासलेपणा दूर करणे यासाठी अजिबात नव्हता. भारतीय लोकांविषयी ब्रिटिशांना सहानुभूती वाटत होती म्हणूनही नव्हता. तर ब्रिटिशांचे साम्राज्य भारतात अधिक बळकट व्हावे, ते भक्कम पायावर उभे रहावे यासाठी ब्रिटिशांना हवा असलेला नोकरदारांचा, कामगारांचा पुरवठा करण्यासाठी शिक्षण ही त्यांना गरजेची बाब होती. म्हणून भारतात ठिकठिकाणी इंग्रजी शाळा सुरू करण्याचे, किंबहुना शिक्षणाचा प्रसार करण्याचे काम ब्रिटिशांनी केले.

ब्रिटिशांनीपाश्चात्य शिक्षणावर भर दिला. मात्र इंग्रजी शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या भारतीय तरुणांना जेव्हा इंग्लंड मधील लोकषाही शासनप्रणालीचा परिचय झाला तेव्हापासून इंग्रजांच्या भारतीय साम्राज्यवादाविषयी त्यांच्या मनामध्ये तिरस्कार निर्माण होण्यास प्रारंभ झाला.

1839 ला कुलाबा संस्थान ब्रिटिश साम्राज्यात विलिन झाल्यानंतर ठिकठिकाणी शिक्षणाचा प्रसार होण्यास प्रारंभ झाला. 1840 मध्ये महाड येथे पहिली देशी शाळा सुरू झाली. खिश्चन मिशनरी, खाजगी शिक्षणसंस्था अथवा सरकार यांनी केलेल्या शिक्षणाच्या प्रसारातून आधुनिक शिक्षणाची कवाडे सामान्यांना खुली झाली.

Key Word –शिक्षण, शाळा, इंग्रज

**संदर्भ**

[1]. कठारे (डॉ.) अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, 2009, पृ. 101
[2]. राऊत गणेश व इतर, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (1818–1960), डसयमंड पब्लिकेशन्स पुणे, 2009, पृ. 113
[3]. चौधरी कि. का., (संपा.) रायगड जिल्हा गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, 1993, पृ. 582
[4]. ढबू दा. गो., कुलाबकर आंग्रे सरखेलःआंग्रे घराण्याचा इतिहास, शंकर नारायण जोशी, अलिबाग, 1939, पृ. 342
[5]. कदम य. ना., पूर्वोक्त, पृ. 204
[6]. चौधरी कि. का., (संपा.) पूर्वोक्त, पृ. 609
[7]. कुलाबा गॅझेटिअर, 1883, पृ. 230
[8]. सुवर्णक्षण, पनवेल नगरपरिषद शतकोत्तर महोत्सव ग्रंथ, 1852–2002, पृ. 63
[9]. चौधरी कि. का., (संपा.) पूर्वोक्त, पृ. 609
[10]. जाधव (डॉ.) बबन भिवसेन, रायगड जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळःशेतकऱ्यांचा सहभाग, लक्ष्मी बुक पब्लिकेशन्स, सोलापूर,2014, पृ. 72
[11]. कशाळकर हर्षद, कोकण एज्युकेशन सोसायटीची शताब्दी, दै. लोकसत्ता, 20 डिसेंबर 2017

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

DOI: 10.48175/ IJARSCT-8118